सकाळ

# कर्मवीर वाघ यांनी सहकाराचा पाया रचला

## डॉ. सुधीर तांबे : के. के. वाघ संस्थेत संयुक्त पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता.२२ : कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारून शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. कर्मवीर काकासाहेबांनी सहकाराचा पाया रचला. आमदार असताना इगतपुरी येथे स्वत:च्या सरकारविरोधात भातशेती लढा उभारला. काकासाहेबांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. त्याचा परिपाक म्हणजे के. के. वाघ शिक्षण संस्था होय, अशी भावना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी आज व्यक्त केली.**




नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कर्मवीर काकासाहेब वाघ, काकूशेठ उदेशी व तात्यासाहेब बोरस्ते संयुक्त पुण्यस्मरणप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. सुधीर तांबे. शेजारी मान्यवर.

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कै. देवराम सयाजी तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी कै. माधवराव बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम आज संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात ऑनलाइन व ऑफलाइन स्वरुपात संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार डॉ. सुधीर तांबे उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते. माजी महापौर प्रकाश मते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, सध्या शिक्षण क्षेत्रात मोठी आव्हाने व समस्या उभा ठाकल्या आहेत. शिष्यवृत्ती दिरंगाई हे मोठी समस्या होय. त्यामुळे महाविद्यालयांचे भवितव्य अंधारले आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षणात मोठी उदासीनता दिसून येते.

संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. याप्रसंगी व्यासपीठावर विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतला वाघ, मविप्रच्या माजी सरचिटणीस निलीमा पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, अजिंक्य वाघ, अँड. दिलीप वनारसे, संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविकातून संस्थेबद्दल माहिती दिली. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी तर प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

### शिक्षणाबरोबर पारंपरिक व्यवसायही शिका : मते

**■ कर्मवीरांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून सर्वसामान्य कुटुंबातील मुला- मुलींना शिक्षण उपलब्ध करुन दिले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर आपल्या पारंपरिक व्यवसायाचे शिक्षण घेणे गरजेचे आहे. वेळप्रसंगी गाव, शहर व राज्य सोडण्याची तयारी असायला हवी. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश मते यांनी केले.**

# काकासाहेब वाघ यांनी रचला सहकाराचा पाया

## माजी आमदार डॉ. सुधीर तांबे : के. के. वाघ संस्थेत कर्मवीरांना आदरांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मविरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारून शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी सहकाराचा पाया रचला. आमदार असताना इगतपुरी येथे स्वतःच्या सरकार विरुद्ध भात शेती लढा उभारला. त्यामुळे त्यांना जिल्ह्यातून तडीपार केले. काकासाहेब यांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. त्याचा परिपाक म्हणजे के. के. वाघ शिक्षण संस्था होय, अशा भावना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केल्या.

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक तर्फे कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी कै. माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम सोमवारी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथे ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात झाला. तयावेळी तांबे बोलत हाते.



कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेत आयोजित पुण्यस्मरण कार्यक्रमात बोलताना डॉ. सुधीर तांबे. समवेत मान्यवर.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे, माजी महापौर प्रकाश मते उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. याप्रसंगी व्यासपीठावर विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतला वाघ, मविप्र समाजाच्या माजी सरचिटणीस निलिमा पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, अजिंक्य वाघ, संस्थेचे सचिव प्रा के. एस. बंदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत संस्थेबद्दल माहिती दिली. त्यानंतर बाळासाहेब वाघ व कर्मवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या जीवनपटाद्वारे त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी, तर प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार प्रदर्शन केले.

गांवकरी
www.gavakari.net
23 Jul 2024 - Page 8

# क. का. वाघ यांनी सहकाराचा पाया रचला : डॉ. तांबे

## संयुक्त पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली

**नाशिक : प्रतिनिधी**

**कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारुन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी सहकाराचा पाया रचला. आमदार असताना इगतपुरी येथे स्वत:च्या सरकार विरुद्ध भात शेती लढा उभारला. त्यामुळे त्यांना जिल्ह्यातून तडीपार केले. काकासाहेब यांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. त्याचा परिपाक म्हणजे के.के. वाघ शिक्षण संस्था होय. अशा भावना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केल्या.**



के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिकतर्फे कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी कै. माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे यांनी विशेष उपस्थिती म्हणून हजेरी लावली. माजी महापौर व उद्योजक प्रकाश मते यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. याप्रसंगी व्यासपीठावर विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतलाताई वाघ, मविप्र समाजाच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले. प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

दैनिक
लोकनामा

# काकासाहेब वाघ यांनी सहकाराचा पाया मजबूत केला

## डॉ. तांबे : के. के. वाघ शिक्षण संस्थेत संयुक्त पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

लोकनामा प्रतिनिधी




**नाशिक** : कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारून शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी सहकाराचा पाया मजबूत केला. आमदार असताना इगतपुरीत स्वसरकारविरुद्ध भातशेती लढा उभारला. त्यामुळे त्यांना जिल्ह्यातून हद्दपार केले. काकासाहेबांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. त्याचा परिपाक म्हणजे के. के. वाघ शिक्षणसंस्था होय, अशी भावना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी येथे व्यक्त केली.

के. के. वाघ शिक्षणसंस्था, नाशिकतर्फे देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी माधवराव ऊर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम सोमवारी (दि. २२) संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात झाला.

नाशिक बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे यांची विशेष उपस्थिती होती. माजी महापौर व उद्योजक प्रकाश मते अध्यक्षस्थानी होते. संस्थाध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी मान्यवरांचा सत्कार केला.

व्यासपीठावर विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतलाताई वाघ, मविप्र समाज संस्थेच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व निफाड तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थागीताने झाली. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविकात संस्थेबद्दल माहिती दिली. त्यानंतर बाळासाहेब वाघ व कर्मवीरांच्या प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या जीवनपटाद्वारे त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकार महर्षी माधवराव ऊर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा सहवास लाभला, हे माझे भाग्य समजतो. कर्मवीर काकासाहेब वाघ हे आजोबा असल्याने त्यांचे करारी बाणा व कामकाज करण्याची पद्धत अनुभवण्याचे भाग्य लाभले. काकासाहेब आमदार असताना त्यांचे राज्यातील नेत्यांपेक्षा दिल्लीतील नेत्यांसमवेत अधिक संपर्क होता. काकासाहेबांनंतर तात्यासाहेब बोरस्ते यांनी त्यांच्या कार्याची धुरा सांभाळली, असे प्रतिपादन ॲड. दिलीप वनारसे यांनी केले. ऑनलाइन कार्यक्रमास सहाशेहून अधिक शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, कृषी व सहकार क्षेत्रातील मान्यवर, पालक, हितचिंतक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

> कर्मवीरांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून सर्वसामान्य कुटुंबातील मुला-मुलींना शिक्षण उपलब्ध करून दिले. सध्या विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात विसंवाद वाढलेला आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर आपल्या पारंपरिक व्यवसायाचे शिक्षण घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आपला पारंपरिक व्यवसाय आधुनिक पद्धतीने करत रोजगारनिर्मिती केली पाहिजे. त्यासाठी वेळप्रसंगी गाव, शहर व राज्य सोडण्याची तयारी असायला हवी.
>
> – **प्रकाश मते,** माजी महापौर, उद्योजक

# वाघ संस्थेत संयुक्त पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली

प्रतिनिधी | नाशिक

कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारुन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे कर्मवीर काकासाहेब वाघ सहकाराचा पाया रचला. त्यांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्याचे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था आयोजित देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रमात ते बोलत होते. नाशिक बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे, माजी महापौर प्रकाश मते, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर आदी यावेळी उपस्थित होते.

दिव्य मराठी

सकाळ

# नाशिकचे वैभव कर्मवीर काकासाहेब वाघ

**निफाड तालुक्याच्या सहकार, शिक्षण आणि समाजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व, नाशिकचे वैभव कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा सोमवारी (ता. २२) स्मृतिदिन, त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...**

**– समीर वाघ** (अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

शेतकरी आणि बहुजन समाजासाठी आयुष्यभर योगदान देणाऱ्या कर्मवीर काकासाहेब अखिल भारतीय मराठा विद्याप्रसारक परिषदेचे प्रमुख आधारस्तंभ, मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे आधारवड, निफाड सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व रानवड कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष, इंडियन शूगर इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनचे अध्यक्ष, नॅशनल फेडरेशन ऑफ को- ऑपरेटिव्ह शूगर फॅक्टरीजचे सदस्य, शिक्षण क्षेत्रातील जाणकार कर्तेसुधारक, स्वातंत्र्ययोद्धे, धुरंधर राजकारणी, सहकार-कृषी-जलसिंचन क्षेत्रातील सक्रिय कार्यकर्ते, शेतमजूर-उपेक्षित आणि गरीब कामगारांचे आधारस्तंभ अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पेलल्या. या क्षेत्रात कार्य करताना काकासाहेबांनी गरजू लोकांना अधिक जपले. आपल्यापरीने त्यांच्या शक्य त्या सर्व अडचणी सोडविल्या. त्यामुळे ही सगळी सर्वसामान्य माणसे काकासाहेब यांना दैवत मानून कार्यरत राहिली. काकासाहेब वाघ यांच्यानंतर माझे वडील व के. के. वाघ शिक्षण संस्थेचे दिवंगत अध्यक्ष बाळासाहेब (भाऊ) वाघ यांनी काकासाहेबां प्रमाणेच निफाड तालुका केंद्रस्थानी ठेवून विविध



पातळ्यांवर शासनदरबारी प्रश्न सोडविण्याचे विशेष प्रयत्न केले.

राजर्षी शाहू महाराज व महात्मा फुलेंच्या कार्यातून प्रेरणा घेत काकासाहेबांनी नाशिक जिल्ह्यात शिक्षण प्रसार करण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न केले. त्यांनी आपले इंग्रजी शिक्षण गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूल (सेंट जॉर्ज), नाशिक येथून घेतले आणि उपजीविकेसाठी बांधकाम व्यवसाय स्वीकारला. बांधकामशास्त्रात त्यांना विशेष आवड, गती आणि सूक्ष्म अभ्यासही होता. उभारलेल्या प्रत्येक बांधकामाचा दर्जाही त्यांनी उत्तम ठेवला. आजही नाशिक जिल्ह्यात काकासाहेबांनी बांधलेली अस्थापने व इमारती सुस्थितीत उभ्या आहेत. याचेच एक उदाहरण म्हणजे मेन रोडवरील नाशिक महापालिकेची इमारत...

पिंपळगाव बसवंत या मध्यवर्ती ठिकाणी मुलींच्या उच्चशिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी वरिष्ठ महाविद्यालय सुरू करावयाचे ठरले, त्यासाठी काकासाहेब सहकाऱ्यांसह निफाड, चांदवड, दिंडोरी व परिसरात पायी फिरले आणि त्यांनी अडीच लाख रुपये उभारले. काकासाहेबांनी दाखविलेली ही धडपड आणि केलेले प्रयत्न पाहून सर्वानुमते या महाविद्यालयाचे 'कर्मवीर काकासाहेब वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय' असे नामकरण केले. हे महाविद्यालय आजही दिमाखात सुरू आहे. १९५७ ते १९६२ यादरम्यान ते विधिमंडळ सदस्य अर्थात, 'आमदार' होते. या काळात त्यांनी जिल्ह्यातील अनेक जटिल प्रश्न मार्गी लावले. दूरदृष्टी ठेवून सहकारी तत्त्वावर त्यांनी निफाड, गिरणा, रानवड, नाशिक व कादवा कारखान्यांसाठी मंजुरी मिळवून दिली.

काकासाहेबांनी आयुष्यात विविध जबाबदाऱ्या आणि आव्हाने पेलली. मिळालेल्या पदांचा त्यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी वापर केला. काकासाहेब साखर संघाचे अध्यक्ष असताना व नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शूगर फॅक्टरीज, नवी दिल्लीचे सदस्य असताना राज्यातील लेव्ही साखरेस त्यांनी योग्य भाव मिळवून दिला.

१९७०-७१ या दोन वर्षांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्षपद मिळाल्यावर त्यांनी आपला बराचसा वेळ या महत्त्वाच्या पदांसाठी दिला. 'डेक्कन शूगर इन्स्टिट्यूट' जे आज 'वसंतदादा शूगर इन्स्टिट्यूट' या नावाने प्रचलित आहे. त्याचीही मूळ संकल्पना काकासाहेबांनी मांडली होती. काकासाहेब वाघ यांचे हे त्यागमय जीवन, त्यांनी सहकार, कृषी, शिक्षण, राजकारण या क्षेत्रांत सामाजिक बांधिलकीने उभारलेले भव्यदिव्य कार्य, त्यांची तळमळ आणि काम करून घेण्याची हातोटी यामुळे जनतेने त्यांना 'कर्मवीर' ही पदवी बहाल केली. काकासाहेबांचा समाजाप्रति त्याग, समर्पण व बहुजन समाजाच्या कल्याणासाठी केलेले अहोरात्र कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांच्या या योगदानाबद्दल २६ जानेवारी १९७० ला त्यांना 'पद्मश्री' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन यथोचित गौरव केला.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# काकासाहेब यांनी 'सहकारा'चा पाया रचला

## डॉ. सुधीर तांबे : के. के. वाघ संस्थेत संयुक्त पुण्यतिथी कार्यक्रमात आदरांजली

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारून शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. काकासाहेब यांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. त्याचा परिपाक म्हणजे के. के. वाघ शिक्षण संस्था होय. त्यांच्यामुळे नाशिक जिल्ह्यात सहकाराचा पाया रचला गेला, अशा भावना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केल्या.



**नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेत संयुक्त आदरांजली कार्यक्रमात बोलताना डॉ. सुधीर तांबे.**

के. के. वाघ शिक्षण संस्थेत कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, कै. रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकारमहर्षी कै. माधवराव ऊर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम सोमवारी (दि.२२) घेण्यात आला. त्यावेळी डॉ. तांबे यांनी आदरांजली वाहिली. उद्योजक प्रकाश मते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी व्यासपीठावर नाशिक बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे, चांगदेवराव होळकर, शकुंतलाताई वाघ, नीलिमाताई पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी उपस्थित होते.

सध्या विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात विसंवाद वाढला आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर पारंपरिक व्यवसायाचे शिक्षण घेणे गरजेचे आहे. पारंपरिक व्यवसाय आधुनिक पद्धतीने करत रोजगारनिर्मिती करावी. प्रसंगी गाव, शहर व राज्य सोडण्याची तयारी हवी, असे प्रकाश मते यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी मान्यवरांचा सत्कार केला. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन, तर प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

Nashik Edition Edition
Jul 23, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
23 Jul 2024 - Page 10

# कर्मवीर काकासाहेबांनी सहकाराचा पाया रचला : डॉ. तांबे

## संयुक्त पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली

**नाशिक । प्रतिनिधी**

कर्मवीर काकासाहेब वाघ व इतर कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक संस्था उभारुन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी सहकाराचा पाया रचला, असे प्रतिपादन माजी पदवीधर आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे दिवंगत देवराम वाघ, कर्मवीर काकासाहेब वाघ, रतनशी उदेशी, काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथे ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुधीर तांबे, नाशिक बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे उपस्थित होते.माजी महापौर व उद्योजक प्रकाश मते यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. सध्या शिक्षण क्षेत्रात मोठी आव्हाने व समस्या उभा ठाकल्या आहेत. शिष्यवृत्ती



दिरंगाई ही मोठी समस्या आहे. प्राथमिक शिक्षणात मोठी उदासीनता दिसून येते. आपण एकत्रीतपणे हा प्रश्न शासनदरबारी मांडायला हवा, असे डॉ. सुधीर तांबे म्हणाले. तत्पूर्वी संस्था अध्यक्ष समीर वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. याप्रसंगी व्यासपीठावर विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतला वाघ, मविप्र समाजाच्या माजी सरचिटणीस नीलिमा पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा के. एस. बंदी आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी तर प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.